# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** रत्नागिरी
**P.S.(ठाणे):** रत्नागिरी शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0371
**Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/09/2025 17:47

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 11/09/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/09/2025
**Time From (वेळेपासून):** 17:29 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/09/2025
**Time (वेळ):** 17:23 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 039
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/09/2025 17:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मुदतीत सहाय्यक संचालक, वर्ग 1 स्थानिक निधी लेखा, परिक्षण कार्यालय रत्नागिरी,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शंकर उध्दव नाईकवाडे मो. नं. 9822661252

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1970

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रुम 202,सुखकर्ता अपार्टमेंट, दुसरा मजल,दापोली दाभोळ रोड,दापोली, जि रत्नागिरी,रत्नागिरी शहर,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उंदर गाव, ता म्हाडा,जि सोलापुर,जि सोलापुर,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9822661252

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री शरद रघुनाथ जाधव | | | 1. पद- सहाय्यक संचालक,वर्ग-1, स्थानिक निधी लेखा,परिक्षण कार्यालय रत्नागिरी, ,रत्नागिरी शहर,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री सिध्दार्थ विजय शेटये | | | 1. पद- सहा लेखाधिकारी,वर्ग-3, वित्त विभाग, ,जिल्हा परिषद रत्नागिरी, ,रत्नागिरी शहर, रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | श्री. सतेज शांताराम घवाळी | | | 1. पद- शिपाई कंत्राटी वर्ग-4, स्थानिक निधी लेखा,परीक्षण कार्यालय रत्नागिरी ,रत्नागिरी शहर,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 12/09/2025

मी शंकर उध्दव नाईकवाडे, वय 55 वर्षे , व्यवसाय-नोकरी, सहाय्यक लेखाधिकारी, पंचायत समिती दापोली, ता. दापोली, जि. रत्नागिरी, सध्या रा. सुखकर्ता अपार्टमेंट, दुसरा मजला, रुम नं. 202, दापोली दाभोळ रोड, मु.पो. ता. दापोली, जि. रत्नागिरी, मुळ रा. उंदर गाव, ता. म्हाडा, जि. सोलापुर, मो. नं. 9822661252 फिर्याद लिहून देतो की,

''मी पंचायत समिती दापोली, ता. दापोली या ठिकाणी सहाय्यक लेखाधिकारी म्हणुन कार्यरत आहे. सहा. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय, रत्नागिरी यांचे मार्फत आमचे कार्यालयाचे लेखा परीक्षण करण्यात येते. त्यानुसार सन 2020 -2021 व सन 2021 -2022 या आर्थिक वर्शातील लेखापरीक्षण अहवालामधील आक्षेप घेतलेल्या व प्रलंबित असलेल्या 21 परिच्छेदांची पुर्तता करुन त्याची पुर्तता केलेबाबतचा अंतिम अनुपालन अहवाल मिळणेबाबत मा. गटविकास अधिकारी, प.सं. दापोली यांनी दि. 04/08/2025 रोजी दिलेला अहवाल मी स्वतः सहा. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय, रत्नागिरी यांचे कार्यालयात येवून दि. 05/08/2025 रोजी सादर केला होता व अंतिम अनुपालन अहवाल सादर केल्यानंतर आक्षेपाचे ते 21 परिच्छेद वगळून अंतिम अहवाल (एफआर) मिळण्याबाबत त्या पत्रात नमूद करण्यात आले होते.

नमुद अनुपालन अहवालाचे अनुशंगाने मी स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय, रत्नागिरी याठिकाणी तेथील कंत्राटी कर्मचारी श्री. घवाळी यांची दि. 05/08/2025 रोजी भेट घेतली असता, अनुपालन अहवालानुसार पुर्तता केलेले आक्षेपाचे 21 परिच्छेद वगळुन त्याप्रमाणे ते आक्षेपाचे परिच्छेद वगळलेबाबतचा अंतिम अहवाल (एफआर) देण्याकरीता श्री. शरद जाधव साहेब, सहा. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय, रत्नागिरी यांचेकरीता त्यांचे कार्यालयातील कंत्राटी शिपाई श्री. घवाळी यांनी माझेकडे 24,000/- रुपये रक्कमेची मागणी केलेली आहे. श्री. शरद जाधव साहेब यांचेकरीता कंत्राटी शिपाई श्री. घवाळी हे मागत असलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाल्याने तसेच मला लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी येथे समक्ष हजर राहुन माझी लेखी तक्रार देत आहे. श्री. शरद जाधव साहेब सहा. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय, रत्नागिरी व कंत्राटी शिपाई श्री. घवाळी यांचेत व माझेत कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत तसेच त्यांच्याषी माझे कोणतेही वैयक्तिक वैर नाही. तरी श्री. शरद जाधव साहेब सहा. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय, रत्नागिरी व कंत्राटी शिपाई श्री. घवाळी यांचेवर योग्य ती कायदेषीर कारवाई होणेस विनंती आहे''

वगैरे मजकुराचा माझ्या स्वहस्ताक्षरातील माझे स्वाक्षरीचा तक्रारी अर्ज पोलीस निरीक्षक श्री. सुहास रोकडे यांचेकडे

सादर केला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सुहास रोकडे यांनी बोलाविलेवरुन 16.15 वा. सुमारास 2 इसम लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, रत्नागिरी येथे आले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. रोकडे यांनी ते दोन इसम हे सरकारी पंच असलेबाबत मला सांगुन त्यांची व लाचलचुपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील कर्मचारी यांची ओळख करुन दिली. त्यांनतर मी दिलेला तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचानी तक्रारी अर्ज वाचुन त्यावर सहया करुन पोलीस निरीक्षक श्री रोकडे यांनीही समक्ष म्हणुन त्यावर सही करुन तो तक्रारी अर्ज आपल्या ताब्यात घेतला.

त्यानंतर दिनांक 11/09/2025 रोजी मी लोकसेवक श्री. शरद जाधव साहेब सहा. संचालक व कंत्राटी कर्मचारी श्री घवाळी यांची प्रत्यक्ष भेट घेवुन पुढील पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री रोकडे यांनी सांगितले. त्यावेळी आमचेत होणारे संभाषण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकून ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री रोकडे यांनी पंचांना व मला सांगितले. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री रोकडे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, रत्नागिरी येथे पडताळणी अधिकारी म्हणुन स्वतःचे आणि पडताळणी साठी लोकसेवकाची भेट घेण्यासाठी प्रत्यक्ष जात असलेबाबत माझे व पंचांचे निवेदन डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले.

पोलीस निरीक्षक श्री रोकडे यांनी मला व पंच नं. 1 श्री राठोड यांना योग्य त्या सुचना देवुन लोकसेवकांची भेट झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय रत्नागिरी येथे परत येण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री रोकडे यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे षर्टच्या आत बनियन मध्ये लपविला. त्यानंतर मी व पंच नंबर 1 राठोड असे माझे मालकीचे हुंदाई व्हेन्यु चारचाकी वाहन क्र. एमएच 45 अॅक्यु 6998 या वाहनाने स्थानिक निधी लेखा परीक्षण कार्यालय, रत्नागिरी येथे जाण्यासाठी रवाना झालो. काही वेळानंतर मी व पंच क्र. 1 राठोड असे दोघे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, रत्नागिरी याठिकाणी परत आले. पोनि रोकडे यांनी माझ्या जवळील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला.

पोनि रोकडे यांनी मला घडलेली हकिकत विचारली त्यावेळी मी त्यांना, मी व पंच नं. 1 राठोड असे माझे मालकीचे चारचाकी वाहन क्र. एमएच 45 अक्यु 6998 या वाहनाने स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय, रत्नागिरी याठिकाणी गेलो. त्यानंतर मी कार्यालयाचे आवारात वाहन पार्क केल्यानंतर स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय, रत्नागिरी कार्यालयात गेलो. त्यावेळी पंच राठोड देखील माझ्या पाठोपाठ स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय, रत्नागिरी कार्यालयात आले. त्यानंतर मी शरद जाधव, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा यांचे कार्यालयात जावुन पाहीले असता श्री. जाधव हे कार्यालयात हजर नव्हते. म्हणुन मी तेथील कंत्राटी शिपाई श्री. घवाळी यांना जाधव साहेबांबाबत विचारले असता त्यांनी मला जाधव साहेब जिल्हा परिशद रत्नागिरी येथे गेल्याचे सांगुन सहा. लेखाधिकारी श्री. सिध्दार्थ शेटये यांना फोन लावण्यास सांगितले. मी शेटये यांना फोन केला असता शेटये यांनी सांगितले कि, आक्षेपांचे मुद्दे त्यांचेकडे असुन त्यावर ते षेरे मारुन घेतील असे सांगितले. थोडया वेळाने जाधव साहेब ऑफिस मध्ये आल्यावर मी पुन्हा शेटये यांना फोन लावुन साहेब ऑफिस ला आल्याचे सांगुण ते मुद्दे घेवुन ऑफिस ला या असे सांगितले. थोडयावेळाने शेटये हे जाधव साहेबांचे ऑफिस ला आले. मी शेटये यांचेकडील मुद्दे घेवुन स्वतः जाधव साहेब यांना नेवुन दाखविले. त्यानंतर माझेत व लोकसेवक जाधव यांचेमध्ये लेखा परिक्षणातील त्रुटींबाबत चर्चा चालु होती. दिनांक 05/08/2025 रोजी घवाळी यांचेषी झालेल्या भेटीमध्ये लोकसेवक जाधव यांचेकरीता शिपाई घवाळी यांनी 24000/- रक्कमेची माझेकडे मागणी केली होती व उजवे हाताचे बोटांनी खूण करुन मी रक्कम आता आणलेबाबत लोकसेवक जाधव यांना सांगितले असता, लोकसेवक जाधव यांनी बाहेर घवाळी यांचे दिषेने हाताने खुणवुन हे बाहेर.... असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना घवाळीकडे ना....? असे लोकसेवक जाधव यांना विचारले असता ते, हे तो सांगेल असे ते मला म्हणाले. त्यावेळी मी लोकसेवक जाधव यांचे केबीनचे बाहेर आलो व घवाळी यांना भेटलो व 21 पैकी एकुण 15 मुददे कमी झाल्याचे घवाळी यांना सांगितले. त्यावेळी घवाळी यांनी मला त्या प्रकरणाची पडताळणी करुन परिच्छेदातील 3 मुददे हे बांधकामाचे असुन इतर 12 मुददे असे मिळून सोळा पाचशे असे सांगितले होते. त्यावर मी त्यांना किती असे विचारले असता घवाळी यांनी सोळा पाचषे असे सांगितले. त्यावर मी त्यांना सोळा हजार पाचशे का असे विचारले असता घवाळी यांनी हं..... असे बोलले असता मी त्यांना काय कमी नाय? असे विचारले असता घवाळी यांनी मला नाय काय कमी, बांधकामाचे पंधराषे असे सांगितले. त्यावर मी पंधराशे? असे विचारले असता घवाळी यांनी मला पंधराषे दया असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना पैसे घेवुन येतो लगेच असे सांगितले त्यावेळी घवाळी यांनी येताय जावुन....? एफआर जनरेट करायची.....? असे सांगितले असता मी त्यांना हो...हो... घेवुन येतो मी सोळा पाचषे असे सांगितले. त्यावेळी घवाळी यांनी मला काय करु थांबु देत का असे विचारले असता मी त्यांना अर्धा तास लागेल मला असे सांगितले. त्यानंतर मी कार्यालयातुन बाहेर निघुन आलो. त्यानंतर मी व पंच नं. 1 राठोड असे माझे चारचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी या ठिकाणी परत आलो.'' अशी हकीकत सांगितली.

पोनि रोकडे यांनी पंच नं. 1 राठोड यांचे कडे घडलेल्या हकीकती बाबत विचारणा केली असता पंच नं. 1 राठोड यांनी मी सांगितलेल्या हकिकतीप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली.

त्यानंतर पोनि रोकडे यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील फाईलचा कालावधी पाहीला असता तो सुमारे 1 तास 30 मिनिटांचा असल्याचे आढळुन आले. तसेच लोकसेवक घवाळी यांनी तात्काळ पैसे घेवुन येण्यास सांगितले असुन लाच मागणीबाबतचे संभाशण सुमारे 1 तास 15 मिनीटांनंतर झाल्याचे मी सांगितले. त्याप्रमाणे लाच रक्कम मागणीची खात्री करण्याकरीता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तुर्तास सुरुवातीचे काही व 1 तास 15 मिनीटांनंतरचे संभाषण पंचाना व मला ऐकविले. त्यामध्ये मी व पंच नं. 1 राठोड यांनी सांगितल्याप्रमाणे संभाषण झाल्याचे आढळुन आले. मी माझा व लोकसेवक श्री. जाधव, घवाळी व शेटये यांचा आवाज ओळखला.

पडताळणी दरम्यान मी कार्यरत असलेल्या कार्यालयाचे सन 2020-2021 व सन 2021-2022 या आर्थिक वर्शाचे लेखापरिक्षण अहवालामधील घेतलेल्या 21 परिच्छेदांपैकी (आक्षेप) 15 परिच्छेद वगळुन अंतिम अहवाल देण्यासाठी श्री. जाधव सहा. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय, रत्नागिरी यांचेकरीता त्यांचे कार्यालयातील कंत्राटी शिपाई श्री. घवाळी यांनी लोकसेवक शेटये यांचे समक्ष माझेकडे 16,500/- रुपयांचे लाच रक्कमेची मागणी करुन सदरची लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानुसार लागलीच सापळा कारवाई करण्यात येणार असल्याने पोनि रोकडे यांनी मला व पंचाना सांगितले. पडताळणी वेळेची स्क्रिप्ट नंतर बनविणार असल्याचे पोनि रोकडे यांनी मला व पंचाना सांगितले.

पोनि रोकडे यांनी सापळा कारवाईच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या सापळापूर्व पंचनाम्याचा उद्देष समजावून सांगितला. त्यानंतर पोनि रोकडे यांनी पंचांना व मला सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरु करण्यात येत असल्याबाबत सांगितले.

त्यानंतर पोनि रोकडे यांच्या सुचनेवरून पंचांनी माझ्या पेहरावाचे निरीक्षण केले. माझ्या अंगात पांढ-या रंगाचा राखाडी चेक्स असलेला फुल हाताचा षर्ट व नेसणीस निळया फिकट पांढ-या रंगाची फुल पॅन्ट आहे, पायात बुट घातलेले असुन डोळयावर चश्मा घातलेला आहे.

पोनि रोकडे यांच्या सुचनेवरून मी माझ्या ताब्यातील सर्व रोख रक्कम व खालीलप्रमाणे चीजवस्तू समक्ष हजर केल्या

1) रोख रूपये 25,500/- ( 500/- दराच्या 51 चलनी नोटा)
2) व्हीवो कंपनीचा मोबाईल फोन त्यामध्ये आयडीआय कंपनीचे सिम कार्ड क्रमांक 9822661252 असे आहे
3) एक सफेद रंगाचा हातरूमाल.
4) स्टेट बँक ऑफ इंडीयाच चे एटीएम कार्ड

पोनि रोकडे यांनी मला पंचांसमक्ष लाचेच्या रक्कमेबाबत विचारले असता, माझेकडे लोकसेवकाने पडताळणी दरम्याने 16,500/- इतक्या लाच रक्कमेची मागणी केलेली असुन सदरची रक्कम सोबत आणली असून तीच लाच रक्कम म्हणुन वापरायची आहे असे सांगुण रक्कम माझे वैयक्तिक बचतीतून आणली असल्याचे सांगितले.
त्यानंतर पोनि रोकडे यांनी मी समक्ष हजर केलेल्या रोख रक्कमेमधुन रूपये 16,500/- ( रूपये 500/- दराच्या 33 चलनी नोटा) लाच रक्कम म्हणुन वापरण्यासाठी स्वतःजवळ काढून घेवून बाकीच्या सर्व चीजवस्तू व रोख रक्कम मला परत दिल्या असता मी हातरुमाल आणि उर्वरीत रोख रक्कम मागील खिषात ठेवल्या व मोबाईल पॅन्टचे उजवे बाजुचे खिशात ठेवला.

त्यानंतर पोनि रोकडे यांनी लाच रक्कमेकामी वापरण्यात येणाऱ्या रक्कमेचे नंबर्स पंचांसमक्ष संगणकावर टंकलिखीत करुन ते नंबर्स बरोबर असल्याची खात्री करुन कार्यालयातील प्र त्यानंतर पोनि रोकडे, पंच व सापळा पथक यांनी माझेसमक्ष स्टोअर रुमची पाहणी केली असता तेथील एका पुठयाचे बॉक्सवर खाकी लखोटा ठेवला असल्याचे दिसुन आले. सदर लखोटयाची पंचासमक्ष खात्री करता लखोटयामध्ये लाच रक्कम मिळुण आली. पोनि रोकडे यांच्या सुचनेप्रमाणे पंच नं. 1 राठोड यांनी लाचेची रक्कम असलेला लखोटा ताब्यात घेवून त्यामधील रक्कम बाहेर काढुन मोजली असता त्यामध्ये 500/- रुपये दराच्या एकुण 33 नोटा आढळुण आल्या ती रक्कम एकुण 16,500/- रुपये इतकि होती. नोटांचे नंबर्स टंकलिखित केलेला कागद पाहुन त्या नोटांवरील नंबर हे सापळा कार्यवाहीत वापरण्यात आलेल्या नोटांचेच असल्याचे दिसुन आले. त्यानंतर पोनि रोकडे यांनी मला कार्यालयाचे एका बाजुस थांबुन राहण्याबाबत सांगितले.

त्यानंतर मला बोलावुन माझ्या हाताची व कपडयांची तपासणी केली असता, माझ्या डाव्या हाताच्या बोटांच्या वरील भागास अँन्थ्राँसीन पावडरची फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. तसेच पॅन्टच्या डाव्या बाजूच्या खिशाचे तोंडावर व आतील बाजुस अँन्थ्राँसीन पावडरची फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसून आली.
पंच नं.2 नाचणकर यांनी माझी अंगझडती घेतली. त्यामध्ये सापळापुर्व कारवाईचे पुर्वी होत्या तशा वस्तु मिळुन आल्या. पोनि रोकडे यांचे सुचनेवरून मी माझे हात धुतले.

तरी सहा. संचालक स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय, रत्नागिरी यांचे मार्फत पंचायत समिती दापोली, कार्यालयाचे सन 2020 - 2021 व 2021-2022 या आर्थिक वर्शातील लेखा परीक्षण अहवालामधील प्रलंबित असलेल्या 21 मुद्दयांची पुर्तता केली असुन सदरचे मुद्दे वगळुन तसा अखेर अहवाल (एफआर) देण्याकरीता लोकसेवक घवाळी यांनी सहा. संचालक श्री जाधव यांचेवतीने माझेकडे दिनांक 05/08/2025 रोजी 24000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली होती. त्यानुसार 21 मुद्दयांपैकी 15 मुद्दे वगळुन तसा अखेर अहवाल देण्याकरीता लोकसेवक घवाळी यांनी सहा. संचालक यांचेवतीने दिनांक 11/09/2025 रोजी 17.29 ते 18.54 वाजताचे मुदतीत 16500/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन मागणी केलेली लाच रक्कम लगेचच स्वीकारण्याचे मान्य केले होते. त्यानुसार मागणी केलेली लाच रक्कम 16500/- रुपये दि. 11/09/2025 रोजी 19.26 ते 19.46 वाजताचे मुदतीत स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय, रत्नागिरी याठिकाणी लोकसेवक जाधव यांनी खुणेने लोकसेवक सतेज घवाळी यांचेकडे देणेबाबत सांगितले असता सदरची लाच रक्कम लोकसेवक सतेज घवाळी यांनी स्वीकारल्यानंतर ती लाच रक्कम लोकसेवक सिध्दार्थ शेटये यांचेकडे दिली असता ती त्यांनी तपासुन स्टोअर रुम मध्ये ठेवुन गुन्हयास प्रोत्साहन दिले. सदरची लाच रक्कम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी यांचे सापळा पथकाने पंचासमक्ष हस्तगत केलली आहे. तरी माझी श्री शरद रघुनाथ जाधव वय 53 वर्षे , पद- सहाय्यक संचालक, वर्ग-1, स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय रत्नागिरी, श्री सिध्दार्थ विजय शेटये वय 45 वर्षे , पद- सहा. लेखाधिकारी, वर्ग-3, वित्त विभाग, जिल्हा परिशद रत्नागिरी, व श्री. सतेज षांताराम घवाळी वय 38 वर्ष, पद- शिपाई (कंत्राटी) वर्ग-4 स्थानिक निधी लेखा परीक्षण कार्यालय रत्नागिरी यांचेविरुध्द कायदेषीर फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहीला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

हे लिहून दिले

( सुहास रोकडे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
Gauri Yogesh Surve
**Rank (पद):** HC (Head Constable) **No.(क्र.):** DGPABABEF8601
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

N.C.

I.I.F.-I (एकीकृत

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

(4) **Transferred to P.S.**

(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**

(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**

(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

रत्नागिरी शहर पोलीस ठाणे

जि.रत्नागिरी, राज्य-महाराष्ट्र

फोन-(०२३५२) २२२३३३

**Signature of Officer in charge, Police Station**

(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vivek Balasaheb Pat

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): DGPVBPM8103